|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव २१ (   ) विविध विषयांवर होत असलेले संशोधन व विस्तार वाढविणे गरजेचे आहे तसेच या संशोधनावरील सिध्दांतावर विकास साधणे आवश्यक आहे असे प्रतिपादन भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे आयोजित भाषा व साहित्याचा संशोधनाभिमुख अध्यापकांसाठी आयोजित कार्यशाळेप्रसंगी डॉ.उमाशंकर उपाध्याय (पुणे) यांनी केले.

भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे आयोजित कार्यशाळेप्रसंगी डॉ. उमाशंकर उपाध्याय बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे, प्रा.मुक्ता महाजन, प्रा.सुनील कुळकर्णी उपस्थित होते. पुढे बोलताना उपाध्याय म्हणाले की, संशोधनावर लक्ष केंद्रीत करून समाजउपयोगी संशोधन होणे आवश्यक आहे. तसेच मार्गदर्शक आणि संशोधक यांचा समन्वय घडणे देखील आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा.पगारे म्हणाले की, संशोधन हे केवळ संशोधन न राहता त्याचा व्यवहारात उपयोग होणे गरजेचे आहे तसेच संशोधनासाठी चांगल्या मांडणीची गरज आहे ज्यामुळे संशोधन चांगले होणार असल्याचे सांगितले. आज दिवसभर तीन सत्र आयोजित करण्यात आले होते यात डॉ.दिलीप बारड (भावनमट), प्रा.शैलेंद्र लेंडे (नागपूर), डॉ.उमाशंकर उपाध्याय (पुणे) यांनी संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४० संशोधक विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.ललीत पाटील यांनी तर आभार प्रा.मुक्ता महाजन यांनी मानले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.२१ (   ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाच्या वतीने २७ व २८ फेब्रुवारी रोजी ` भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेपुढील नवीन आव्हाने ` या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून भारतातील संरक्षण तज्ज्ञ व सेवानिवृत्त मेजर जनरल डॉ.जी.डी.बक्षी हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवसाच्या राष्ट्रीय चर्चासत्रात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षे समोरील आव्हाने तसेच भारताचे जागतिक राजकारणात वाढणारे महत्त्व, परराष्ट्र धोरण, अंतर्गत सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, सीमा सुरक्षा, सागरी सुरक्षा, अवकाश तंत्रज्ञान, काश्मीरमध्ये वाढणाऱ्या दहशतवादी कारवाया, भारत-चीन सीमा प्रश्न आणि भारताच्या उत्तर पूर्वोत्तर राज्यातील सुरक्षे संदर्भातील प्रश्न आणि महत्त्व या विषयावर देशभरातील नामवंत सुरक्षा तज्ञ आपले विचार मांडणार आहेत. डॉ.बक्षी यांच्या हस्ते २७ फेब्रवारी रोजी सकाळी १० वाजता उद्घाटन होणार असून अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर राहतील. विशेष अतिथी म्हणून पोलिस अधिक्षक दत्तात्रय कराळे उपस्थित राहणार आहेत.

दोन दिवसाच्या या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रामुख्याने डॉ.जी.डी.बक्षी यांच्यासह डॉ.श्रीकांत परांजपे पुणे, ब्रिगेडीयर हेमंत महाजन पुणे, ग्रृप कॅप्टन अजय लेले दिल्ली, डॉ.अमित मुखर्जी बंगलोर, डॉ.ए.एस.दळवी पुणे, डॉ.जावेद खान, नाशिक, डॉ.लियाकत खान मुंबई, डॉ.प्रियरंजन घोष नाशिक, डॉ.मनोज साळी नाशिक तसेच डॉ.मुंकुंद नार्विकर गोवा आदी हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात वेगवेगळ्या विषयांवर दोन दिवसासाठी मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत. देशातील विविध विद्यापीठातील व संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहे. या राष्ट्रीय चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रीय चर्चासत्राचे संयोजक प्रा.तुषार रायसिंग व कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.तुकाराम दौड यांनी केले आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. २१ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सनील पाटील)